# शिवनेर

३ शिवनेर

शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५

उद्योग आणि सोशल जगत


## लीलावती हॉस्पिटलची मुंबईत नवीन अत्याधुनिक कर्करोग उपचार संस्थेची घोषणा

### भारतातील पहिल्याच नर्सिंग एक्सलन्स प्रोग्रामसाठी मेयो क्लिनिक, यूएसए सोबत सहकार्याची सुरुवात



मुंबई, : लीलावती हॉस्पिटलने मुंबईत ३०० खाटांचे हॉस्पिटल असलेल्या नवीन कर्करोग उपचार संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. ही अत्याधुनिक सुविधा नवीनतम तंत्रज्ञान, प्रगत उपचार आणि ऑन्कोलॉजीमधील जागतिक सर्वोत्तम उपचारांचा मार्ग उघडून भारतातील कर्करोगाच्या उपचारात क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहे. #Lilavatiinitiatives या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर,माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे मान्यवर उपस्थित होते. तसेच सर्वश्री खा. डॉ. श्रीकांत शिंदे, बिजू संकुट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी, इंटरनॅशनल आणि एंटरप्राइझ ऑटोमेशन, मेयो क्लिनिक, चारू मेहता, लीलावती रुग्णालयाच्या संस्थापक आणि स्थायी विश्वस्त, राजेश मेहता, लीलावती रुग्णालयाचे स्थायी विश्वस्त, प्रशांत मेहता, लीलावती रुग्णालयाचे स्थायी विश्वस्त, राजीव मेहता, लीलावती रुग्णालयाचे स्थायी विश्वस्त अशा प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

नवीन कर्करोग उपचार संस्था रुग्ण केंद्रित घटकांवर आधारित तयार केलेले उपचार देईल, ज्यामुळे प्रत्येक रुग्णाला व्यक्तिगत आणि प्रभावी उपचार मिळतील याची खात्री होईल. स्थानिक पातळीवर प्रदान केलेल्या उच्च गुणवत्तेच्या उपचारांमुळे रुग्णांना उपचारांसाठी परदेशात जाण्याची गरज भासणार नाही ज्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाचतील.



अपवादात्मक रुग्ण सेवा प्रदान करण्याव्यतिरिक्त, ही सुविधा आरोग्यसेवा व्यावसायिक, संशोधक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असंख्य नोकरीच्या संधी निर्माण करेल. समाजातील ही महत्त्वपूर्ण गुंतवणूक स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देईल आणि मुंबईतील आरोग्यसेवा क्षेत्राच्या एकूण विकासात योगदान देईल.

कर्करोग उपचार संस्था कर्करोगाच्या जलद आणि अचूक निदानासाठी, रुग्णांच्या निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि जगण्याचा दर सुधारण्यासाठी एआय-चालित निदान उपकरणे तयार करेल. शिवाय, लीलावती हॉस्पिटल समाजाला कर्करोगाची जोखीम, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल शिक्षित करण्यासाठी जागरूकता मोहिमा सुरू करेल, ज्यामुळे आरोग्य आणि निरोगीपणाची संस्कृती निर्माण होईल.

लीलावती हॉस्पिटलला मेयो क्लिनिकसोबत नर्सिंग एक्सलन्स प्रोग्राम सुरू करण्यासाठी सहकार्याची घोषणा करण्याचा आनंद होत आहे. या सामंजस्य कराराचा (एमओयू) उद्देश विशेष प्रशिक्षण आणि विकासाद्वारे आमच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि ज्ञान वाढवणे आहे. या भागीदारीमध्ये नर्सिंग एक्सलन्स शिक्षण, नर्सिंग गुणवत्ता आणि रुग्ण अनुभव, रुग्ण आणि कर्मचारी सुरक्षा, नर्सिंग प्रशासन आणि नेतृत्व विकास, ऑनबोर्डिंग, ओरिएंटेशन आणि कर्मचारी विकास आणि नर्स नैपुण्य यासह विविध क्षेत्रांचा समावेश आहे.

या भागीदारीद्वारे, लीलावती हॉस्पिटल निरीक्षण, रिअल-टाइम सर्वोत्तम सराव मिमांसा आणि संबंधित सत्रांद्वारे प्रशिक्षण देईल. कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर, नर्सना मेयो क्लिनिककडून पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळेल, जे रुग्णसेवेतील उत्कृष्टतेसाठी त्यांच्या समर्पणाची कदर करेल.

लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त राजेश मेहता आणि श्री. प्रशांत मेहता म्हणाले, आम्हाला ही अत्याधुनिक कर्करोग सेवा संस्था मुंबईत आणताना आणि आमच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी मेयो क्लिनिकशी सहयोग करताना खूप आनंद होत आहे. हा उपक्रम जागतिक दर्जाची आरोग्यसेवा प्रदान करण्याची आणि आमच्या रुग्णांचे आणि समाजाचे जीवन सुधारण्याची आमची वचनबद्धता अधोरेखित करतो.

दावोस, स्वित्झर्लंड येथून रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओ संदेशात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकचे अभिनंदन केले आणि ते म्हणाले, ङ्गमला खूप आनंद होत आहे की लीलावती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर मुंबई आणि मेयो क्लिनिक, यूएसए नर्सिंग प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहकार्य करत आहेत. यामुळे आरोग्य सेवा क्षेत्रातच नव्हे तर मानवजातीच्या सेवेच्या मार्गावर एक नवीन प्रवास सुरू होईल. आपल्या देशातील अशा प्रकारचा पहिलाच नर्सिंग प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केल्याने नर्सिंग शिक्षणात क्रांती होईल आणि रुग्ण सेवेचा अतुलनीय दर्जा प्रस्थापित होईल. मी लीलावती हॉस्पिटलच्या नेतृत्त्वाबद्दल, त्यांच्या दूरदृष्टीबद्दल आणि मेयो क्लिनिकच्या जागतिक आरोग्यसेवा प्रगत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेबद्दल मनःपूर्वक आभार मानतो. ही भागीदारी सहकार्याच्या भावनेचे उदाहरण आहे जी एक अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्यासाठी, कौशल्य, स्रोत आणि सामायिक आकांक्षा एकत्र आणणारी सीमा विस्तारित करते. मेयो क्लिनिक गांधीनगर गुजरात येथील आगामी अत्याधुनिक रुग्णालयासाठी तांत्रिक भागीदारीसाठी योगदान देत असून मेयो क्लिनिकच्या ह्या सर्व उपक्रमांमुळे भारतातील आरोग्य सेवा क्षेत्रात परिचारिका, डॉक्टर्स आणि आरोग्य सेवा व्यवसायिक अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाची रुग्ण सेवा आणण्यासाठी चॅम्पियन ठरतील.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लीलावती हॉस्पिटलचे अभिनंदन केले आणि ते म्हणाले, लीलावती हॉस्पिटलने यूएसए मधील जगप्रसिद्ध मेयो क्लिनिकसोबत ऐतिहासिक सहकार्य केले आहे. मी लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकद्वारे स्थापन केलेल्या कर्करोग रुग्णालयाचा संदर्भ फक्त रुग्णालयातच म्हणून नाही तर आरोग्य मंदिर म्हणून घेईन. परिचारिका या आमच्या लाडकी बहिण आहेत आणि त्यांना मेयो क्लिनिकद्वारे प्रशिक्षण दिले जाईल. मला आशा आहे की कौशल्य आणि तंत्राने त्या जगातील सर्वोत्तम परिचारिका बनतील. नर्सिंग स्टाफ हा हॉस्पिटलचा आत्मा आहे ज्याला आरोग्य सेवेमध्ये महत्त्वपूर्ण महत्त्व आहे. अशा प्रकारचे नर्सिंग प्रशिक्षण भारतात प्रथमच आयोजित करण्यात आले आहे. लीलावती हॉस्पिटल हे महाराष्ट्र आणि भारतातील अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या प्रगत रुग्णालयांपैकी एक आहे आणि जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आहे. रुग्णालय आपले ब्रीदवाक्य- **मानवसेवा आरोग्यसेवेपेक्षा अधिक** याला प्राधान्य देते आणि रुग्णांची सेवा करत आहे. बदलती जीवनशैली आणि फास्ट फूडच्या सेवनामुळे कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असून ही चिंतेची बाब आहे. तथापि, कर्करोगाच्या उपचारांसाठी नवीन अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत. मला विश्वास आहे की लीलावती हॉस्पिटलने स्थापन केलेल्या कॅन्सर हॉस्पिटलचा कर्करोगाशी लढा देणाऱ्या रुग्णांना खूप फायदा होईल. महाराष्ट्रातील आरोग्य सेवा बळकट करणे ही सरकारची जबाबदारी असून या सेवा दुर्गम भागातही पोहोचल्या पाहिजेत. ३०० खाटांच्या या प्रतिष्ठित रुग्णालयासाठी जमीन देण्यासाठी आमचे सरकार सकारात्मक, व्यावहारिक सहकार्य करत आहे आणि लीलावती रुग्णालयाने केलेल्या आवाहनाचा आम्ही विचार करू.

## पारस डिफेन्सकडून महाराष्ट्रात ₹१२,००० कोटींच्या भव्य गुंतवणुकीची घोषणा

### भारताच्या पहिल्या ऑप्टीक्स् पार्क निर्मितीकरिता दावोस येथे सामंजस्य करारावर स्वाक्षरी

मुंबई, : पारस डिफेन्स अँड स्पेस टेक्नॉलॉजीज लिमिटेड (पारस डिफेन्स) हे संरक्षण आणि अंतराळासाठी ऑप्टिक्स आणि ऑप्ट्रॉनिक प्रणालींमध्ये अग्रेसर असून, त्यांच्याकडून महाराष्ट्रात भारतातील पहिले ऑप्टिक्स पार्क उभारण्यासाठी रु. १२००० कोटीची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या संदर्भात संरक्षण कंपनीने महाराष्ट्र सरकारशी सामंजस्य करार (एमओयू) केला. स्वित्झर्लंडमधील दावोस येथील प्रतिष्ठित जागतिक आर्थिक मंचावर करण्यात आलेल्या या घोषणेमुळे प्रगत ऑप्टिकल टेक्नॉलॉजीत आत्मनिर्भरतेच्या दिशेने भारताच्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

ही मोठी गुंतवणूक एक अत्याधुनिक तंत्रज्ञान केंद्र तयार करण्यासाठी सज्ज आहे. या पुढाकारामुळे भारताच्या ऑप्टीक्स् आणि ऑप्टीकल सिस्टीम क्षेत्राला नवीन आकार मिळेल. तसेच ऑप्टीकल सिस्टीममधील ग्लोबल लिडर म्हणून स्वतःला स्थापित करेल. महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये तांत्रिक स्वातंत्र्याच्या भारताच्या आकांक्षांना

PARAS DEFENCE & SPACE TECHNOLOGIES LIMITED

पुढे नेताना मेक इन इंडिया उपक्रमाप्रती पारस डिफेन्सच्या वचनबद्धतेचीही याद्वारे पुष्टी होणार आहे. या प्रकल्पामुळे थेट रोजगाराच्या २,००० हून अधिक संधी निर्माण होतील आणि संरक्षण, अंतराळ, वाहन, औद्योगिक आणि व्यावसायिक अनुप्रयोग (ॲप्लिकेशन)सारख्या प्रमुख उद्योगांमध्ये तांत्रिक प्रगतीला चालना मिळेल.

नियोजित सामंजस्य करार (एमओयू) अंतर्गत, महाराष्ट्र सरकारने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प यशस्वी करण्यासाठी जमीन, विविध प्रोत्साहन आणि मंजुरी मिळविण्यासाठी पारस डिफेन्सला सर्वसमावेशक पाठबळ देण्याचे वचन दिले आहे. या घोषणेबद्दल बोलताना पारस डिफेन्स अँड स्पेस टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर मुंजाल शरद शाह म्हणाले, ङ्गङ्गऑप्टिक्स पार्क भारताच्या तांत्रिक क्षमतांना पुढे नेण्यासाठी आमची अतूट वचनबद्धता दर्शवते. हा क्रांतिकारी प्रकल्प केवळ देशांतर्गत उत्पादन परिसंस्थेला चालना देणार नाही तर ग्लोबल इनोव्हेशन हब म्हणून भारताचे स्थान मजबूत करेल. आमचे ऑप्टीक्स् पार्क तांत्रिक अंतर भरून काढेल आणि सर्व क्षेत्रांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण, नवोन्मेष आणि वाढीच्या संधी निर्माण करेल. हा उपक्रम पारस डिफेन्स आणि भारताच्या तांत्रिक आकांक्षा या दोन्हींसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

या भागीदारीवर भाष्य करताना महाराष्ट्र सरकारचे प्रवक्ते म्हणाले, संरक्षण, अंतराळ, ऑटोमोटिव्ह, सेमीकंडक्टर आणि इतर अनुप्रयोग/ॲप्लिकेशनसाठी ऑप्टिकल टेक्नॉलॉजी महाराष्ट्रात नाविन्यपूर्ण संशोधन तसेच तांत्रिक नेतृत्वाला चालना देण्याच्या दिशेने पारस डिफेन्सबरोबर भागीदारीचा आम्हाला अभिमान आहे. हा प्रकल्प राज्याला प्रगत उद्योग आणि गुंतवणुकीचे केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे.

परदेशी तंत्रज्ञानावरील अवलंबित्व दूर करून, ऑप्टिक्स आणि ऑप्टिकल सिस्टीमसाठी भारताला स्वावलंबी केंद्र (सेल्फ-रेलियंट हब)मध्ये रूपांतरित करण्याच्या पारस डिफेन्सच्या दृष्टिकोनाचा ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट, ऑप्टिक्स पार्क हा आधारस्तंभ आहे. पारस डिफेन्सफ्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामार्फत मार्गदर्शक संस्था, आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि भांडवली बाजारपेठा, थेट परकीय गुंतवणूक आणि देशांतर्गत गुंतवणूकदार इत्यादींमधील प्रवेशाचा लाभ घेण्याची योजना आखली आहे.

विस्तारक्षमता आणि लवचिकता सुनिश्चित करण्यासाठी ऑप्टीक्स् पार्क प्रोजेक्ट २०२८ पासून टप्प्याटप्प्याने सुरू होईल आणि २०३५ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

## एथर एनर्जीने भारतीय ग्राहकांसाठी बहु-भाषिक डॅशबोर्ड सादर केला

मुंबई : एथर एनर्जी लिमिटेड या भारतातील इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांनी आपल्या रिझ्टा या फॅमिली-स्कूटरमध्ये एक बहु-भाषिक डॅशबोर्ड इंटरफेस सादर केला आहे. या स्कूटरचा डॅशबोर्ड आता हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली, तमिळ, तेलुगू, मल्याळी आणि कानडी या ८ प्रादेशिक भाषांना समर्थन देईल. त्यामुळे अधिक व्यापक ग्राहकवर्गासाठी हा डॅशबोर्ड अधिक सोयिस्कर होऊन चालकांचा गाडी चालवण्याचा अनुभव आणखी सुधारेल. यामध्ये अगोदर हिंदी डॅशबोर्ड लॉन्च होईल आणि त्या पाठोपाठ इतर प्रादेशिक भाषांमध्ये डॅशबोर्डची सुविधा प्राप्त होईल.




IAMAI आणि कांतारच्या इंटरनेट इन इंडिया २०२४ रिपोर्ट अनुसार, २०२४ मध्ये ९८% इंटरनेट यूझर्सनी भारतीय भाषांमध्ये कंटेंट ॲक्सेस केला. भारतीय सामान्यतः आपल्या प्रादेशिक भाषेतील डिजिटल कंटेंट पसंत करतात, मग ते लेख वाचणे असो, व्हिडिओ बघणे असो किंवा माहिती गोळा करणे असो. आपल्या भाषेतील कंटेंट त्यांना अधिक सोयिस्कर आणि परिचित वाटतो. याची दखल घेऊन एथरने वेगवेगळ्या भाषांमध्ये डॅशबोर्ड विकसित करून तो आपल्या ग्राहकांसाठी सादर करण्यावर काम केले.

एथर एनर्जीचे चीफ बिझनेस ऑफिसर रवनीत सिंह फोकेला म्हणाले, आम्ही सुरुवातीपासूनच भारतीय ग्राहकांचा विचार मनात ठेवून आमची टेक्नॉलॉजी आणि उत्पादने डिझाईन केली आहेत. आमचा उद्देश नेहमी यूझरला दर्जेदार अनुभव प्रदान करण्याचा असतो, यामुळेच आमच्या स्कूटर आकर्षक वाटतात. भारतातील समृद्ध विविधता आणि आपापल्या प्रादेशिक भाषेविषयी लोकांना वाटणारा अभिमान लक्षात घेऊन आमच्या स्कूटर्स अधिक यूझर-फ्रेंडली बनवण्याचा आमचा उद्देश होता. आम्हाला विश्वास वाटतो की, बहु-भाषिक डॅशबोर्डमुळे चालक आपली स्कूटर आपल्या पसंतीच्या भाषेत पर्सनलाईझ करू शकतील.

वर्तमान आणि नवीन रिझ्टा Zमालकांना AtherStackTM च्या ओव्हर-द-एअर (OTA) सॉफ्टवेअर अपडेटच्या रूपात हा बहु-भाषिक डॅशबोर्ड प्राप्त होईल. एथरचे AtherStackTM हे सॉफ्टवेअर इंजिन याच कंपनीत बनवले जाते आणि ते एथर स्कूटर्सच्या सर्व अनुभवांना ताकद प्रदान करते. ते ग्राहकांना फॉलसेफTM, ऑटोहोल्डTM, डॅशबोर्डवर व्हॉट्सॲप नोटिफिकेशन्स, लाईव्ह लोकेशन शेअरिंग पिंग माय स्कूटर, ॲलेक्सा इन्टिग्रेशन आणि यांसारख्या इतर काही फीचर्सचा ॲक्सेस प्रदान करून ग्राहकांची सुविधा आणि कनेक्टिव्हिटी वाढवते.

एथरच्या मुख्य दोन उत्पादन श्रेणी आहेत एथर ४५० आणि रिझ्टा, ज्या अनुक्रमे परफॉर्मन्स आणि सुविधेला प्राधान्य देणाऱ्या आहेत. खास करून भारतीय रस्त्यांच्या स्थितीसाठी त्यांची चाचणी करण्यात आली आहे. एप्रिल २०२४ मध्ये लॉन्च झालेली रिझ्टा सोय, सुविधा आणि सुरक्षेवर लक्ष केंद्रित करते. यात एक मोठी सीट, सपाट फ्लोअरबोर्ड, रिव्हर्सचे बटण, डिस्क ब्रेक आणि ट्रक्शन कंट्रोलसारखी सुरक्षा फीचर्स, डॅशबोर्डवर व्हॉट्सॲप नोटिफिकेशन्स, ॲलेक्सा स्किल्स इन्टिग्रेशनसह व्हॉईस कमांडची सोय आणि ५६L पर्यंतची एकंदर स्टोरेज क्षमता आहे. गेल्या वर्षी, एथरने हॅलो हे एक स्मार्ट हेल्मेट देखील लॉन्च केले आहे, ज्यामध्ये चिटचॅटTM (हेल्मेट-ते-हेल्मेट संवाद प्रणाली), एक प्रीमियम साऊंड सिस्टम, नॉईज फिल्टरेशनने सुसज्ज मायक्रोफोन आणि हे हेल्मेट घातल्यावर यूझरच्या फोनशी हेल्मेटला आपोआप कनेक्ट करणारे ऑटो वेअरडिटेक्ट सेन्सर्स यांसारखी फीचर्स आहेत.

## *राज्यात उत्पादन सुविधाकेंद्र स्थापन करण्यासाठी तेलंगणा सरकारची JSW डिफेन्ससोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी*

*दावोस, : तेलंगणा सरकारने JSW डिफेन्सची पूर्ण मालकीची उपकंपनी JSW UAV लिमिटेडसोबत राज्यात मानवरहित हवाई प्रणाली (UAS) तयार करण्यासाठी अत्याधुनिक उत्पादन सुविधा स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार (MoU) केला आहे.*

*या धोरणात्मक उपक्रमाचा एक भाग म्हणून, JSW UAV सुमारे 800 कोटी रुपयांची गुंतवणूक या प्रकल्पात करणार आहे. अमेरिकेतील अग्रगण्य संरक्षण तंत्रज्ञान कंपनीसोबत तंत्रज्ञान कराराद्वारे ही गुंतवणूक केली जाईल.*

*दावोस येथे सुरू असलेल्या जागतिक आर्थिक फोरम (WEF) च्या पार्श्वभूमीवर सामंजस्य करारावर तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि JSW ग्रुपचे पार्थ जिंदाल तसेच राज्यातील वरिष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली.*

*या प्रसंगी तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री रेवंत रेड्डी म्हणाले, "हैदराबाद आणि तेलंगणा यांनी जागतिक बाजारात सॉफ्टवेअर आणि औषधनिर्मिती क्षेत्रातील अग्रणी म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. स्पष्ट दृष्टिकोन आणि परिश्रमांच्या आधारे आता तेलंगणा सेमीकंडक्टर, संरक्षण, खाजगी अवकाश ते FMCG यांसारख्या विविध क्षेत्रांमधील उत्पादनांमध्ये, गुंतवणुकीसाठी एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत आहे. चीन प्लस वन धोरण राबवून जगभरात सर्वांसाठी तेलंगण हा प्रभावी, प्राधान्याने विचारात घेण्याचा पर्याय म्हणून स्थान निर्माण करण्याच्या माझ्या सरकारच्या प्रयत्नांना आता यश मिळत आहे."*

*JSW ग्रुपचे पार्थ जिंदाल म्हणाले, "हा सामंजस्य करार भारतातील संरक्षण तंत्रज्ञानाचे स्वदेशीकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देण्याच्या आमच्या दृढ बांधिलकीचे प्रतीक आहे. तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री. रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे मार्गदर्शन आणि उद्योगस्नेही धोरणांमुळे असे उपक्रम शक्य होत आहेत. याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत."*

*JSW डिफेन्स प्रायव्हेट लिमिटेड ही 24 अब्ज अमेरिकन डॉलर किमतीच्या JSW समूहाचा भाग असून Shield AI, Inc या अमेरिकेतील अग्रगण्य संरक्षण तंत्रज्ञान कंपनीसोबत त्यांची धोरणात्मक भागीदारी आहे. या भागीदारीच्या माध्यमातून Shield AI चे V-BAT", ग्रुप 3 मानवरहित हवाई प्रणाली (UAS) चे भारतात स्वदेशीकरण व उत्पादन केले जाईल. ही भागीदारी जागतिक दर्जाचे UAS तंत्रज्ञान भारतात आणून देशाच्या संरक्षण क्षमतांना चालना देण्यासाठीचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.*

## दादर युनियन संघाला ड्रीम ११ स्पर्धेचे विजेतेपद; यासिन सौदागर स्पर्धेत सर्वोत्तम

मुंबई, : दादर युनियन स्पोर्टींग क्लब संघाने ड्रीम ११ या १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत विजेतेपदाचा मान मिळविला. दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या माहुल, चेंबूर येथे झालेल्या अंतिम फेरीच्या लढतीत त्यांनी प्रतिस्पर्धी साई सिया क्रिकेट क्लब संघावर तब्बल १२५ धावांनी विजय मिळविला. यासिन सौदागर आणि तुषार सिंग हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. यावेळी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात बोलताना भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी खेळाडूंना कायम आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा आणि कायम शिस्तबद्ध राहा कारण तुमची पुढची पायरी ही मुंबई संघाचे प्रतिनिधित्व करण्याची असेल. दादर युनियनला उच्च दर्जाची क्रिकेटची परंपरा आहे आणि आतापर्यंत या क्लबने कितीतरी खेळाडूंना प्रथम श्रेणी आणि कसोटी क्रिकेट साठी संधी मिळवून दिलेली आहे असेही त्यांनी पुढे सांगितले. या स्पर्धेत तब्बल आठ शतके ठोकली गेली याविषयीही त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी विशेष अतिथी म्हणून मंगेश भालेकर आणि ड्रीम स्पोर्ट्सचे प्रशांत तायडे देखील उपस्थित होते. मुंबईतील मैदान बचाव मोहिमेत मंगेश भालेकर यांचा हातभार लागला असून दडकर मैदानातील कितीतरी होतकरू आणि गरीब गुणवान खेळाडूंना त्यांनी मदतीचा हात देत त्यांना उच्च दर्जाचे क्रिकेट खेळण्यासाठी प्रोत्साहित केले आहे असे वेंगसरकर यांनी सांगितले.तत्पूर्वी दादर युनिअन संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ४० षटकांत६ बाद २८७ धावांचे लक्ष्य उभारले. यासिन सौदागर (१०५) आणि




तुषार सिंग (४५) या दोघांनी त्यांना १९.३ षटकांतच १२३ धावांची सलामी दिली. यासिन सौदागर याने केवळ ७९ चेंडूत ८ चौकार आणि ७ षटकारांसह १०५ धावा केल्या. त्याला वेदांत देसाई (५५), हर्ष गायकर (२६) आणि वरुण दोषी (२४) यांनी चांगली साथ दिली. साई सिया संघाच्या साई सनील याने ६७ धावांत २ बळी मिळविले. या आव्हानाचा पाठलाग करताना साईराज सानप (३४), रुद्र सुकाळे (२०), गौतम साठे (४२) आणि सिद्धांत दुबे (३१) यांचा अपवाद वगळता साई सिया संघाच्या अन्य फलंदाजांना दोन आकडी धावसंख्या गाठण्यातही अपयश आले आणि त्यांचा डाव ३६.४ षटकांत १६२ धावांत गडगडला. मंथन (१६/२), शिवम गुप्ता (३०/२) आणि श्रेयान चाळके (२४/२) यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवत दादर युनियन संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.अंतिम सामन्यात आणि या स्पर्धेत दोन शतके आणि दोन अर्धशतकांसह एकूण ३६९ धाव करणाऱ्या यासिन सौदागर याला अंतिम सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू, सर्वोत्तम फलंदाज आणि स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू अशा तीन पुरस्कारांसह गौरविण्यात आले. स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाज म्हणून साई सिया संघाच्या ईशान देशपांडे (१२ बळी) याला तर स्पर्धेतील सर्वोउत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून तुषार सिंग (दादर युनियन) यांना गौरविण्यात आले.

भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर, मंगेश भालेकर आणि ड्रीम स्पोर्ट्सचे प्रशांत तायडे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.संक्षिप्त धावफलक - दादर युनियन - ४० षटकांत ६ बाद २८७ (यासिन सौदागर १०५, तुषार सिंग ४५, वरुण दोषी २४, हर्ष गायकर २६, वेदांत देसाई ५५; साई सनील ६७ धावांत २ बळी) वि.वि. साई सिया स्पोर्ट्स क्लब - ३६.४ षटकांत सर्वबाद १६२ (साईराज सानप ३४, रुद्र सुकाळे २०, गौतम साठे ४२, सिद्धांत दुबे ३१; मंथन १६ धावांत २ बळी, शिवम गुप्ता ३० धावांत २ बळी, श्रेयान चाळके २४ धावांत २ बळी )



**टीम चेन्नई सिंगम्स (एल-आर): वेदांत मयेकर, दीपक डोगरा, राहुल सावंत, फरहत अहमद, सियाद्री, मोहम्मद जीशान, जगत सरकार, सुमीत ढेकळे (कर्णधार), अनुराग सरशर, आर. थाविथ कुमार, जिग्नेश पटेल, शुभम सांगळे, वेंकटचलपाठी विघ्नेश, देविद गोगोई, प्रशांत गरहाट. चेन्नई सिंगम्स रविवार, २६ जानेवारी २०२५ पासून सुरू होणाऱ्या आगामी इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (ISPL)सीझन २ मध्ये गर्जना करण्यासाठी सज्ज आहे. संघ सरस्वती स्पोर्ट कॉम्प्लेल्स मालाड येथील त्यांचा सराव मैदानावर जोरदार सराव करत स्पर्धेतील आव्हानांचा सामना करण्याची तयारी करत आहे.**

## सुमती मंडळाच्या कॅरम स्पर्धेत पुष्कर गोळे विजेता



मुंबई : सुमती सेवा मंडळ व दहिसर स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित १८ वर्षाखालील मोफत शालेय कॅरम स्पर्धेत पोद्दार अकॅडमी-मालाड स्कूलच्या पुष्कर गोळेने विजेतेपद पटकाविले. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यात अचूक खेळ करणाऱ्या पुष्कर गोळेने युनिव्हर्सल स्कूल-दहिसरच्या वेदांत राणेचा १३-१० असा पराभव केला. डावाच्या मध्यापर्यंत आघाडी घेऊनही वेदांत राणेला अखेर उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. उद्योजक सौरभ घोसाळकर, को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस नरेंद्र सावंत व कार्याध्यक्ष सुनील साळवी, दहिसर स्पोर्ट्स फाउंडेशनचे चिटणीस दिलीप महांबरे, सुमती मंडळाचे अध्यक्ष प्रमोद पार्टे, प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या-उपविजेत्यांना गौरविण्यात आले.

मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यातील उदयोन्मुख ३२ ज्युनियर खेळाडूंच्या सहभागाने ही स्पर्धा दहिसर-पूर्व येथे रंगली. स्पर्धेमध्ये पाटकर विद्यालय-डोंबिवलीचे नील म्हात्रे व प्रसाद माने यांना उपांत्य उपविजेते, पार्ले टिळक विद्यालयाचा अमेय जंगम, पोद्दार अकॅडमी-मालाडचा प्रसन्न गोळे, पाटकर विद्यालय-डोंबिवलीचा वेदांत पाटणकर, ठाकूर रामनारायण पब्लिक स्कूल-दहिसरचा साहिल गुप्ता यांना उपांत्यपूर्व उपविजेते आणि केवल कुलकर्णी, तृशांत कांबळी, विराज ठाकूर, ध्रुव शाह, अनय म्हेत्रे, शंभू धुरी यांनी उत्तेजनार्थ पुरस्कार मिळविला. स्पर्धेचे शानदार उद्घाटन दहिसर स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी आमदार डॉ. विनोद घोसाळकर, विद्या मंदिर माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधीर देसाई व विश्वस्त श्रीकांत सुर्वे, कॅरमप्रेमी विष्णू तांडेल आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सुमती सेवा मंडळाचे सुशील सावंत, सतीश धुळप, रत्नाकर नाईक, गजानन लाड, विजय कदम, प्रदीप परब आदींचे सहकार्य लाभले होते.